चक्रम - विक्रम

एक होता राजा
त्याचे नाव विक्रम
विचार येती, त्याच्या डोक्यात
नेहमी नेहमी चक्रम ॥

एकदा राजा बसला होता
एकटा आपल्या दरबारात
भल्या मोठ्या मिशीला
मोठ्या प्रेमाने कुरवाळत ॥

एकदम त्याच्या डोक्यात
नवा नवा विचार आला
त्याने फर्मान् काढले
की संगीतात बोला ॥

कुणी बोलले गद्यात
तर त्याचे मुंडके उडवीन
संगीतात बोलला तर
बक्षिस त्याला देईन ॥

त्याची प्रजा आता
संगीतातच बोले
दरबाराचे कामकाज
तासन् - तास चाले ॥

दरबाराच्या कामकाजात
सचीव घेती ताना
सारे मंत्रमुग्ध होऊन
डोलविती माना ॥

एक होता हुशार सचीव
त्याला काही कळेना
सारखे सारखे संगीतात
त्याला बोलणे जमेना ॥

एकदा आग लागली
मोठ्या राजवाड्याला
हुकूमाशिवाय राजाच्या
नाही कुणी विझवायला ॥

सचीव गेला दरबारात
घेतल्या ताना पाच सात
त्यात एवढा वेळ गेला
की राजवाडाच जळून गेला ॥

असा होता एक राजा
त्याचे नाव चक्रम
मधून मधून करतो तो
नवे नवे विक्रम ॥

o o

– शशिकांत पानट

('अमेरिका तरंग' या कवितासंग्रहातून)